नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९/०८/२०२५ ( शुक्रवार )**

---

## अवैधरित्या अग्निशस्त्र (माउजर) बाळगणाऱ्या आरोपीवर गुन्हा नोंद, २ आरोपी अटक

## स्थानिक गुन्हे शाखा,नागपुर ग्रामीण जिल्हा यांची कामगिरी

पो.स्टे. रामटेक :— दिनांक २८/०८/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांचे पथक रामटेक उपविभागात पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदारा मार्फतीने माहिती मिळाली की, आरोपी क्रं. १. प्रविण कृष्णा शरणागत, रा. डोगरी वार्ड, क्र १ ता. रामटेक, याचे जवळ देशी बनावटीचे माउजर असुन तो नेहमी माउजर जवळ बाळगतो. अशा खबरेवरून पोलीसांनी सापळा रचुन मौजा भोंदेवाडा शिवार, सुर नदीचे काठावर, रोडवर नमुद आरोपी क्रं **१ प्रविण कृष्णा शरणागत व ३२ वर्ष रा.डोगरी वार्ड क्र १ ता.रामटेक** याला ताब्यात घेवुन पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता आरोपी त्याच्या जवळ एक लोखंडी स्टिल पॉलीश असलेला माउजर मॅगझीन सह मिळुन आले. आरोपीला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याचे जवळ परवाना नसल्याचे सांगितले. नमुद आरोपीला माउजर कोठुन आणले याबाबत विचारपुस केली त्याने **आरोपी क्र २. पवन विठठल कुंभलकर, वय ४० वर्ष, रा. कन्हान कांद्री, ता. पारशिवनी यांचासह त्याचे मदतीने अंदाजे २ वर्षापुर्वी पाहीजे आरोपी क्र ३ खिलेंद्रसिंह हिरासिंग धुर्वे, वय ३० वर्षे, रा. कालीमाटी, ता.कटंगी बालाघाट मध्य प्रदेश याचेकडुन नमुद माउजर खरेदी केल्याने सांगितले.**

नमुद आरोपी क्रं १ याच्या ताब्यातुन पंचासमक्ष एक लोखंडी स्टिल पॉलीश असलेला माउजर मॅगझीन सह किंमती ३५,०००/— रूपये आणि एक ॲंड्रॉईव्ह मोबाईल किंमती १५,०००/—रूपये असा एकुण ५०,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद तिन्ही आरोपीविरूद्ध पोस्टे रामटेक येथे कलम ३/२५, ५/२५ शस्त्र अधिनियम १९५९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी क्रं १ आणि २ यांना अटक करण्यात आली आहे.






## सोनाराच्या दुकानात चोरी करणाऱ्या आरोपीला राजस्थान येथुन अटक, उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत फिर्यादी नामे जनार्धन पांडुरंगजी अड्याळवाले यांचे मनिष अड्याळवाले ज्वेलर्स नावाचे सोन्या चांदीचे दागिण्यांचे दुकान असुन दिनांक ३०/१२/२०२४ रोजी फिर्यादीचे त्यांचे वर नमुद दुकानात हजर असतांना ११/२४ वा. दरम्यान त्यांचे दुकानात दोन अनोळखी ईसम ग्राहक म्हणुन आले व कॉउंटर वर हात ठेवुन फिर्यादीना सोन्याच्या बाळ्या दाखविण्याच्या बहाण्याने दोन्ही इसमांनीं फीर्यादीचे लक्ष विचलीत करुन दुकाणाच्या काउंटर वरुन सोन्याचे दागीणे एकुण १२० ग्रॅम किंमती ३,८२,३५२/—

रूपयांचा ऐवज चोरून नेला.अश्या फिर्यादीचे तोंडी रीपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे अप. क्र. ६८६/२०२५ कलम ३०३ (२), ३०५ (अ), ३(५) भा.न्या.सं. हा गुन्हा नोंद आहे.

उमरेड पोलीसांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास करत गोपनीय बातमीदारांच्या आणि तांत्रिक पुराव्याच्या मदतीने सदर प्रकरणातील दोन ईसमांपैकी मुख्य आरोपीचे नाव मोहमद अली लीयाकत अली, रा. भुसावळ जि. जळगाव हा असल्याची माहीती प्राप्त झाली होती. पोलीसांनी त्याचा शोध घेतला परंतु तो मिळुन आला नाही. नमुद आरोपी हा मागील आठ महीण्यापासुन तो राजस्थान, मध्यप्रदेश, गुजरात, बिहार ईत्यादी ठिकाणी सतत पत्ते बदलवुन राहत होता. दिनांक २१/०८/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना शिताफिने आरोपीचा कसुन शोध घेवुन सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी मोहम्मद अली लीयाकत अली, वय ३७ वर्षे, याला ता. डेगाना, जि नागौर, ( राजस्थान ) येथुन ताब्यात घेवुन अटक केले. नमुद आरोपी ५ दिवस पोलीस कोठडी रिमांड मध्ये असतांना आरोपीकडे पोलीसांनी अधिक चौकशी केली असता त्याने सदर गुन्हा हा त्याचा साथीदार अब्बास अली ईस्लाम अली, रा.जावरा, जि. रतलाम (मध्यप्रदेश) याच्यासह मिळुन केल्याचे कबुल केले. नमुद गुन्ह्यात चोरी गेलेल्या मुद्देमालापैकी ५ तोळे सोने किंमती १,३०,०००/– रूपये असा मुद्देमाल जि.रतलाम, जावरा (मध्यप्रदेश )येथुन हस्तगत करण्यात आला आहे. उर्वरीत मुद्देमाल हा आरोपी मोहम्मद अली लीयाकत अली याने त्याची सख्खी बहीण हीच्या मार्फतीने विक्री केल्याचे सांगीतल्याने .नमुद गुन्हयातील पाहीजे आरोपी अब्बास अली ईस्लाम अली, रा.जावरा, जि. रतलाम (मध्यप्रदेश) आणि महीला आरोपी यांचा शोध सुरू आहे.




## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, २ आरोपी अटक, जलालखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— दिनांक २८/०८/२०२५ रोजी जलालखेडा पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फतीने माहिति मिळाली की, अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा जलालखेडा ते भारसिंगी रोडवर नाकाबंदी केली असता पांढ—या रंगाची मारूती सूझूकी स्विफ्ट डिजायर कार क्रमांक एम एच ०८ एक्स ८८९९ येतांना दिसली. पोलीसांनी वाहन थांबवले आणि सदर वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता वाहनामध्ये महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला सुगंधीत तंबाखु मिळुन आला. **वाहन चालक**

**आरोपी क्रं १. विक्रम ज्ञानेश्वर कोरडे, वय रा ३० वर्षे, रा. गूरूदेव वार्ड, क्र ३ पांढूर्णा मध्यप्रदेश, २. गुणवंत उपासराव वघाडे, वय ३२ वर्षे, रा. गांधी वार्ड, पांढूर्णा हे मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांचे ताब्यातुन वेगवेगळया कंपनीचे २५९.३ किलोग्रॅम महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेले सुगंधीत तंबाखु किंमती १,९२,३५२/— रूपये, तसेच मारूती सूझूकी स्विफ्ट डिजायर कार क्रमांक एम एच ०८ एक्स ८८९९ किंमती ५,००,०००/— रूपये असा एकुण ६,९२,३५२ /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे.नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे जलालखेडा येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **नमुद आरोपीतांना पोलीसांनी अटक केली आहे.**



## जबरीने मोबाईल चोरी करणाऱ्या आरोपीतांना अवघ्या ६ तासात केले निष्पन्न. १ आरोपी अटक, बुटीबोरी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुटीबोरी** :— पोलीस स्टेशन बुटीबोरी अंतर्गत फिर्यादी नामे दिपक विठठलराव पोल, वय ५५ वर्षे, रा. जिजामाता शाळेचे मागे, सृष्टी सोसायटी वार्ड क्र ०३ बोरी, ता.जि. नागपुर हे दिनांक २३/ ०८/२०२५ चे रात्री ०९:५० वा चे सूमारास चौधरी हॉस्पीटल बोरी समोरून रोडने जात असतांना त्याचा हातातील iQ कंपनीचा Z6 LITE ॲड्रॉईड मोबाईल दोन अज्ञात चोरटयांनी मोटर सायकलने मागून येवुन हिसकवून चोरून नेला. अश्या फिर्यादीचे तोंडी रीपोर्ट वरुन पो.स्टे. बुटीबोरी येथे दिनांक २८/०८/२०२५ रोजी अपराध क्रमांक ८१७/२५ कलम ३०४(२), ३(५) भान्यासं गुन्हा नोंद आहे.

बुटीबोरी पोलीसांनी गोपनिय माहीती आणि तांत्रिक पध्दतीने सदर गुन्हयाचा सखोल तपास करून गुन्हा दाखल झाल्यावर अवघ्या ६ तासात सदर गुन्हयातील आरोपी दोन सराईत आरोपी आणि एक विधीसंघर्षित बालक यांची टोळी निष्पन्न केली आहे. आज दिनांक २९/०८/२०२५ रोजी सदर गुन्हयात **आरोपी क्रं १)** नामे पंकज मोहन बांगरे, रा. सुकळी बेलदार व **क्रं २)** विधी संघर्षित बालक यांना सुकळी बेलदार येथुन ताब्यात घेवुन त्यांचे कडुन १) १,५२,५००/—रूपयांचे १३ मोबाईल हॅन्डसेट, २) गुन्ह्यात वापरण्यात आलेली बजाज पल्सर मोसा क्र. एम एच ४० बी झेड १६०५ किंमती १,००,०००/— रूपये आणि,३) गुन्ह्यात वापरण्यात आलेली हिरो स्प्लेंडर मोसा क्र. एम एच ४० बी.वाय ७४३३ किंमती ५०,००० /— रूपये असा एकुण किंमती ३,०२,५०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. **आरोपी नामे पंकज मोहन बांगरे, रा. सुकळी बेलदार याला अटक करण्यात आली आहे**


स्थापना सन : 1989
महाराष्ट्र पोलीस
पोलीस स्टेशन बुटीबोरी
नागपूर ग्रामिण

## अज्ञात मृतकाची ओळख पटवुन त्याचा खुन करणाऱ्या आरोपीचा तात्काळ घेतला शोध
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक २८/०८/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कुही अंतर्गत खेडी शिवारातील श्रावण घोरमारे यांच्या शेतीच्या बाजुला पाणी जाण्याकरीता खोदलेल्या नालीत एक अनोळखी पुरूषाचे प्रेत मिळुन आल्याने पोलीस स्टेशन कुही येथे मर्ग नोंद करण्यात आला होता. मृतकाचे पाय दोरीने बांधुन असल्याने सदर प्रकरणात खुन झाला असल्याचे दिसुन आल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ तपास सुरू केला असता गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पध्दतीने तपास करून तात्काळ आरोपी नामे मनोज गंगाधर पेलणे, वय ४१ वर्षे,रा. शिवनी तालुका कुही ह. मु. खेडी शिवार याला ताब्यात घेतले. आरोपीला कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता मृतक हा त्याचा लहान भाउ नामे शिशुपाल गंगाधर पेलणे, वय ४० वर्षे, रा. शिवनी तालुका कुही ह. मु. खेडी शिवार हा असुन त्याचे आरोपीच्या पत्नी सोबत अनैतिक संबध असल्याने आरोपीने पाडव्याच्या दिवशी मृतक झोपुन असतांना त्याला काठीने डोक्यात मारून त्याचा खुन करून त्याचे पाय बांधुन त्याला नाली फेकुन दिल्याचे सांगितले. सदर आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने पोलीस स्टेशन कुहीला हस्तांतरीत केले आहे. पुढील तपास कुही पोलीस करीत आहेत.



तपास पथक स्थानिक गुन्हे शाखा

## खुन करणाऱ्या आरोपीला अटक

**पोलीस स्टेशन जलालखेडा :—** फिर्यादी नामे रामहरी तुळशीराम धावळे, वय ३२ वर्षे, रा. रोहणा ता. नरखेड यांनी पोलीस स्टेशन जलालखेडा येथे तोंडी रिपोर्ट दिली की, फिर्यादी यांचा लहान भाउ रामकृष्ण धावळे याला आरोपी नामे शिवहरी डोमाजी गेडाम,वय ३२ वर्षे, रा. रोहणा ता. नरखेड जि. नागपूर याने बाजार चौक, रोहणा येथे मृतक नामे—रामकृष्ण धावळे, रा. रोहणा याला पैसे मागीतले मृतक याने पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपीने मृतकाला काठीने पाठीवर मारल्याने मृतक हे सदर घटनास्थळी बेशुध्द अवस्थेत खाली पडलेले होते . अशा तोंडी रिपोर्टवरून जलालखेडा पोलीस स्टेशन येथे दुखापतीचा गुन्हा नोंद असुन दिनांक २८/०८/२०२५ रोजी मेडीकल कॉलेज नागपुर येथे उपचारादरम्यान सदर गुन्हातील जखमी रामकृष्ण तुळशिराम धावडे, वय ३२ वर्ष, रा. रोहणा हे मरण पावल्याने सदर गुन्हात कलम १०३(१) भा.न्या.सं. प्रमाणे (खुन) या अशी कलम वाढ करण्यात आली आहे. नमुद गुन्हयातील आरोपी नामे शिवहरी डोमाजी गेडाम, वय ३२ वर्षे, रा. रोहणाता. नरखेड जि. नागपूर याला जलालखेडा पोलीसांनी तात्काळ अटक केली आहे.

## खुन करणाऱ्या आरोपीला अटक

**पोलीस स्टेशन जलालखेडा :—** फिर्यादी नामे श्रीमती सिंधु रामदास पाटील, वय ५९ वर्षे, रा. दावसा ता. नरखेड यांनी पोलीस स्टेशन जलालखेडा येथे तोंडी रिपोर्ट दिली की, दिनांक २७/०८/२०२५ रोजी फिर्यादीला माहीती मिळाली की, त्यांचा मुलगा नामे नितेश रामदास पाटील, वय ३२ वर्षे, याला काहीतरी कारणाने आरोपी नामे अर्पण नरेंद्र बनसोड, वय २२ वर्ष, रा दावसा ता. नरखेड, जि. नागपूर याने बानोर गावाचे वळणावर नाल्याजवळ रोडचे बाजुला डोक्याला मारहाण करून जखमी केले. अशा फिर्यादीवरून दुखापतीचा गुन्हा नोंद असुन मृतक नामे नितेश रामदास पाटील हा दिनांक २८/०८/२०२५ रोजी मेडीकल कॉलेज नागपुर येथे उपचारादरम्यान मरण पावल्याने सदर गुन्हात कलम १०३ (१) भा.न्या.सं. प्रमाणे (खुन) या अशी कलम वाढ करण्यात आली आहे. **नमुद गुन्हयातील आरोपी नामे अर्पण नरेंद्र बनसोड, वय २२ वर्ष, रा दावसा ता नरखेड जि नागपूर याला जलालखेडा पोलीसांनी तात्काळ अटक केली आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने